महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थापुणे ,
२८ ,जुने सर्किट हाउस जवळ ,राणीचा बाग ,
पुणे-४११००१.

दूरध्वनी :०२०-२६३६२०७१

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

जा.क्र./आसंप्रसं/२०२५-२६/स्पर्धा परीक्षा/सानुग्रह/का-४/ ४७३ दि. २९/०१/२०२६

# मुदतवाढ घोषणा -

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकरीता केंद्रीय लोकसेवा आयोग -नागरी सेवा मुलाखत २०२५ तयारीकरीता प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य (सानुग्रह) योजनांसाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविणेकरीता मुदतवाढ देणेबाबत...**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे संस्थेमार्फत केंद्रीय लोकसेवा आयोग- नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या पात्र उमेदवारांसाठी मुलाखतीच्या तयारीकरीता प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य देणे (सानुग्रह अनुदान) या योजनांसाठी या कार्यालयाच्या संकेतस्थळावरील प्रसिद्ध करण्यात आलेल्या सुचनापत्रकात दिनांक - १६.१२.२०२५ ते दिनांक - ३१.१२.२०२५ रोजीपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करण्यात यावे असे नमुद होते. परंतु पात्र उमेदवारांकडुन विहित मुदतीत प्रतिसाद मिळाला नसल्याने सदर योजनेकरीता मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

त्यानुसार सदर सुचनेद्वारे जाहीर करण्यात येते की, केंद्रीय लोकसेवा आयोग- नागरी सेवा मुलाखत – २०२५ करीता पात्र व इच्छुक उमेदवारांसाठी दिनांक - २०.०१.२०२६ ते दिनांक - ३१.०१.२०२६ रात्री ११.५९ वाजेपर्यंत सदर योजनेसाठी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्यानुसार ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज सादर करण्याची मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी विहित कालावधीत पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज प्राप्त न झाल्यास उमेदवार सदर योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक नाही असे समजण्यात येईल. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(मंजिरी मनोलकर, भा.प्र.से.)
**आयुक्त,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.**